**गोपनीय**

क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१२१

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २१ एप्रिल, २००८.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १५ मार्च, २००८ (शनिवार) रोजी झालेल्या १२१ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

प्रति,

सर्व सदस्य व निमंत्रित

**प्रत अग्रेषित :-**

विधि सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १२१ व्या बैठकीचे कार्यवृत्त

**दिनांक** : १५ मार्च, २००८ (शनिवार)

**वेळ** : सकाळी ११.३० वाजता

**सभास्थान** : मा.मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष,
६ वा मजला, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**उपस्थित सदस्य :**

| | |
|---|---|
| श्री.विलासराव देशमुख<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| डॉ. (श्रीमती) शुभा राऊळ<br>मुंबईच्या महापौर | सदस्या |
| श्री.रविंद्र वायकर<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.सुनिल प्रभु<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.आशिष शेलार<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.जॉनी जोसेफ<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री.टी.सी.बेंजामिन<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| डॉ.ज.मो.फाटक<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.स्वाधीन क्षत्रीय<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |

श्री.जी.एस.गील सदस्य
व्यवस्थापकीय संचालक, सिडको

श्री.रत्नाकर गायकवाड सदस्य-सचिव
महानगर आयुक्त

**निमंत्रित :**

श्री.जावेद दळवी
महापौर,
भिवंडी-निजामपूर महानगरपालिका

श्री.नरेंद्र मेहता
महापौर,
मिरा-भाईंदर महानगरपालिका

श्रीमती लिलाबाई आशाण
महापौर,
उल्हासनगर महानगरपालिका

श्री.नारायण मानकर
नगराध्यक्ष,
नवघर-माणिकपूर नगरपरिषद

श्री.नंदकिशोर पातकर
नगराध्यक्ष,
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद

श्रीमती रेखा पष्टे
अध्यक्षा,
ठाणे जिल्हा परिषद

ॲड. (श्रीमती) निलिमा पाटील
अध्यक्षा,
रायगड जिल्हा परिषद

श्री.संजय उबाळे
सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

..३/-

बैठकीच्या सुरुवातीस, मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी नगर विकास विभागाचे माजी अपर मुख्य सचिव श्री.रामानंद तिवारी यांनी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषयपत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक २४ डिसेंबर, २००७ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१२० व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक २४ डिसेंबर, २००७ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१२० व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालासंबंधात खालीलप्रमाणे चर्चा झाली :-

**बाब क्र.२ : दिनांक २८ सप्टेंबर, २००७ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ११९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

(१) महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मोनोरेलच्या तांत्रिक निविदा अंतिम करण्यात आल्या असून जुलै पर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मुंबई महानगर प्रदेशात विविध ठिकाणी सुमारे ५० पादचारी उन्नत मार्ग (Pedestrian Sky Walk) बांधणार आहे. त्यामध्ये आवश्यकतेनुसार व उपलब्धतेनुसार उन्नत फेरीवाला/ दुकानक्षेत्राचीही (Elevated Shopper Plaza) तरतूद करण्यात आली असून एकूण सुमारे १५,००० दुकानांना जागा उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच वांद्रे स्थानक (पूर्व) ते वांद्रे-कुर्ला संकुल या पादचारी उन्नत मार्गाचे काम एप्रिल, २००८ अखेरपर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

श्री.शेलार, प्राधिकरणाचे सदस्य यांनी अशी सूचना केली की, फेरीवाल्यांसाठी एक सर्वंकष योजना तयार करण्यात यावी.

डॉ.(श्रीमती) शुभा राऊळ, मुंबईच्या महापौर यांनी अशी सूचना केली की, बोरीवली आणि दहिसर येथेही पादचारी उन्नत मार्गाचे काम हाती घेण्यात यावे. तसेच प्रकल्पांसाठी भूसंपादन करताना पिछेहाट (Set Back) च्या जागेत असलेल्या घरांचे व दुकानांचे त्या ठिकाणच्या मॉलमध्ये समायोजन करण्यात यावे.

यासंबंधात मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे निदेश दिले की, प्राधिकरणाचे महानगर आयुक्त व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महापालिका आयुक्त यांनी संयुक्तपणे फेरीवाल्यांसाठी एक योजना तयार करावी तसेच नवीन पादचारी उन्नत मार्ग बांधण्यासंबंधात प्राधिकरणाच्या सदस्यांनी त्यांच्या सूचना द्याव्यात.

(२) श्री.नंदकिशोर पातकर, नगराध्यक्ष, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद आणि श्री.नारायण मानकर, नगराध्यक्ष, नवघर-माणिकपूर नगरपरिषद यांनी अशी सूचना केली की, ठाणे, कुळगांव-बदलापूर, वसई येथेही मोनोरेल प्रकल्प हाती घेण्यात यावेत. मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी या सूचनेस मान्यता दिली.

(३) निर्मल मुंबई महानगर प्रदेश अभियान संबंधात महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिका वगळून मुंबई महानगर प्रदेशात सुमारे ३०,००० शौचकुपे बांधण्याच्या कामांस चांगली सुरुवात झाली असून ही कामे मार्च, २००९ पर्यंत पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे.

**<u>बाब क्र. ८ : ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय व सर जे.जे.समूह रुग्णालयांच्या नूतनीकरणासाठी राज्य शासनास रु.२० कोटीचे अनुदान देणेबाबत.</u>**

श्री.नंदकिशोर पातकर, नगराध्यक्ष, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांनी अशी सूचना केली की, प्राधिकरणाच्या मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे, सिव्हील हॉस्पिटल, ठाणे या शासकीय हॉस्पिटलसाठी सुध्दा प्राधिकरणाने अशाप्रकारे अनुदान उपलब्ध करुन द्यावे.

..५/-

श्री.जी.एस.गील, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी अशी सूचना केली की, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय व सर जे.जे.समूह रुग्णालयाच्या ठिकाणी उभी इमारत (Vertical Tower) बांधण्यात यावी जेणेकरुन रुग्णालयाची कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

**बाब क्र.१८ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत एस.व्ही.रोड ते पश्चिम द्रुतगती महामार्ग दरम्यान सांताक्रुझ येथील मिलन सबवे लगत भुयारी मार्गासहित रस्ते सुधारणा आणि रेल्वे ओलांडणी पूल बांधण्यासाठी रस्त्याची प्रमाणशीर संरेखन रुंदी १८.३० मीटर वरुन २७.४५ मीटर करणे.**

श्री. शेलार, प्राधिकरणाचे सदस्य यांनी अशी सूचना केली की, खार सबवे वर पूल बांधून सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता स्वामी विवेकानंद मार्गापर्यंत वाढविणे आवश्यक आहे. या सूचनेस मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी मान्यता दिली. यासंबंधात महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, सदर काम बृहन्मुंबई महानगरपालिकेने करावयाचे असून त्यासंबंधात त्यांना कळविण्यात आले आहे. यासंबंधात डॉ.ज.मो.फाटक, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिका सदर काम हाती घेईल.

**बाब क्र. २० : मुंबई महानगर प्रदेशांतर्गत मुंबई महापालिका क्षेत्राबाहेरील वाहतूक सुधारण्यासाठी मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा (MUIP) विस्तार करणे व नव्याने घेण्यात येणाऱ्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.**

श्री.नंदकिशोर पातकर, नगराध्यक्ष, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांनी अशी सूचना केली की, विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पामध्ये उल्हासनगर आणि वांगणी भागातील कामांचाही समावेश करण्यात यावा.

**इतर विषय :** —

(१) श्री.रविंद्र वायकर, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, अंधेरी येथील सबवे लगत असलेल्या लाकडाच्या वखारींचे स्थलांतर केल्यास अंधेरी सबवेचे काम करणे शक्य होईल.

यासंबंधात मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे निदेश दिले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने या विषयी अभ्यास करावा व पुढील कार्यवाही करावी.

(२) श्री.रविंद्र वायकर, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याच्या दुर्गानगर येथील भागात नव्याने अनधिकृत बांधकामे झालेली असून ही बांधकामे तातडीने काढून टाकणे आवश्यक आहे. अशा अनधिकृत बांधकामांची यादी श्री.वायकर यांनी महानगर आयुक्त यांना दिली. श्री.वायकर यांनी पुढे असेही सांगितले की, जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावरील सारीपूत नगर येथील पादचारी वरपूलाच्या बांधकामाला अद्याप सुरुवात झाली नसून सदर काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच या जोडरस्त्यामुळे बाधित होणा-या लोकांसाठी बांधलेल्या वसाहतींमध्ये आवश्यक त्या सोयी-सुविधा अद्याप पूरविण्यात आलेल्या नाहीत. यासंबंधात महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याचे काम मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत सुरु आहे. मात्र मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत जेथे सेवा मार्ग (Service Road) बांधावयाचा आहे त्या ठिकाणी अतिक्रमणे अनेक वेळा काढण्यात आली असून फेर अतिक्रमणे टाळण्यासाठी सेवा मार्गाचे काम लवकरच सुरु करण्यात येईल.

(३) श्री.सुनिल प्रभू, प्राधिकरणाचे सदस्य यांनी असे सांगितले की, जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यामुळे बाधित होणा-या काही लोकांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे खोटी कागदपत्रे सादर केलेली आहेत व त्यामुळे मूळ जागेवर पुन्हा अतिक्रमणे होत आहेत.

(४) डॉ. (श्रीमती) शुभा राऊळ, मुंबईच्या महापौर यांनी अशी सूचना केली की, प्रकल्पामुळे बाधित होणा-या लोकांचे स्थलांतर केल्यानंतर मोकळया होणा-या जागेवर केबीन किंवा तत्सम बांधकामे तातडीने करावीत तसेच प्रकल्पाचे काम तातडीने सुरु करावे जेणेकरुन मोकळया झालेल्या जागेवर पुन्हा अतिक्रमणे होणार नाहीत.

..७/-

या सूचनेस मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी मान्यता दिली तसेच दुर्गानगर येथे सेवा मार्ग बांधण्याचे काम तातडीने हाती घेण्यात यावे असे निदेश दिले.

मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असेही निदेश दिले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेनेही अतिक्रमणे काढून टाकण्याची कामे हाती घ्यावीत व त्यासाठी उप महानिर्देशक दर्जाच्या अधिका-याच्या नियंत्रणाखाली पोलीस दल तातडीने स्थापन करावे.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ ऑगस्ट, २००७ ते दिनांक २९ फेब्रुवारी, २००८.**

दिनांक १ ऑगस्ट, २००७ ते २९ फेब्रुवारी, २००८ या कालावधीत केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.४ : मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचा सन २००८-०९ चा वार्षिक कार्यक्रम.**

महानगर आयुक्त यांनी सन २००८-०९ च्या वार्षिक कार्यक्रमासंबंधी संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या सन २००८-०९ च्या वार्षिक कार्यक्रमास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.११५१ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** (अ) टिप्पणीसह सादर केलेला २००८-०९ सालचा वार्षिक कार्यक्रम व २००८-०९ सालचा मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीचा वार्षिक कार्यक्रम आणि महानगर योजना - फिरता निधीचा (मेगासिटी योजना) वार्षिक कार्यक्रम मंजूर करण्यात येत आहे. (ब) वार्षिक कार्यक्रमांत अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशिलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचे सन २००८-०९ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.**

५.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाचे सन २००८-०९ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तसेच सन २००७-०८ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक यासंबंधी माहिती दिली. महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सन २००७-०८ मध्ये फेब्रुवारी, २००८ अखेरपर्यंत सुमारे रु.३९०० कोटी इतकी रक्कम प्राधिकरणाकडे जमा झाली असून विविध प्रकल्पांवर सुमारे रु.१०५० कोटी इतका खर्च झाला आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, सन २००८-०९ मध्ये प्राधिकरणाकडे एकूण सुमारे रु.६१४५ कोटी इतकी जमा अपेक्षित असून खर्च / कर्जे यासाठी एकूण सुमारे रु.६६४३ कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे. त्यापैकी विविध प्रकल्पांवरील खर्च सुमारे रु.३००० कोटी इतका अपेक्षित आहे. अशाप्रकारे सन २००८-०९ साठी अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा अर्थसंकल्प तसेच सन २००७-०८ चे सुधारीत अंदाजपत्रक प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर केले आहे. सन २००८-०९ मधील प्रकल्पांवरील अर्थसंकल्पीय तरतूदींविषयी माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सन २००८-०९ साठी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प आणि मोनोरेल प्रकल्प यासाठी एकूण सुमारे रु.९७० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे. मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प तसेच विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प यासाठी एकूण सुमारे रु.१२५० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे. तसेच फेरीवाला/दुकानक्षेत्रासह पादचा-यांकरीता उन्नत मार्ग व रेल्वे स्थानक परिसरातील वाहतूक व्यवस्था यासाठी सुमारे रु.६०० कोटी, प्राधिकरणाच्या प्रकल्पांकरीता भूमी संपादन व भूसंचय आणि विकास केंद्र यासाठी सुमारे रु.६१० कोटी, मिठी नदी विकास कामांसाठी सुमारे रु.३०० कोटी, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत उड्डाणपूल बांधणे यासाठी सुमारे रु.१५० कोटी, वडाळा ट्रक टर्मिनलसाठी सुमारे रु.५० कोटी, वडाळा येथे आंतरराज्य वाहनतळ उभारण्यासाठी सुमारे रु.४ कोटी, वांद्रे-कुर्ला संकुलात नागरी सुविधा व इतर सुधारणा यासाठी सुमारे रु.१८० कोटी, ओशिवरा जिल्हा केंद्राच्या विकासासाठी

..९/-

सुमारे रु.२० कोटी, मुंबई पारबंदर छन्नमार्गाच्या अंमलबजावणीसाठी सुमारे रु.२०० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशात भाडेतत्वावर सुमारे ५ लाख घरे बांधावयाची असून सन २००८-०९ मध्ये मुंबई महानगर प्रदेशात भाडेतत्वावर घरबांधणी (Rental Housing) यासाठी सुमारे रु.१०० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे. अशाप्रकारच्या भाडेतत्वावर घरबांधणीसाठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाची आवश्यकता लागेल. निर्मल मुंबई महानगर प्रदेश अभियानांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिका वगळता मुंबई महानगर प्रदेशात सुमारे ३०,००० शौचकूपे बांधावयाची असून त्यासाठी सन २००८-०९ मध्ये सुमारे रु.२५० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापन क्षेत्र विकसित करण्यासाठी प्राधिकरणामध्ये एक स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला असून घनकचरा व्यवस्थापन क्षेत्र विकसित करण्यासाठी सन २००८-०९ मध्ये रु.२० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापनेसंबंधात संबंधित संस्थांसाठी एक कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विकसनामध्ये सार्वजनिक भराव भूमीचे (Common land fill sites) काम हाती घ्यावयाचे आहे. या व इतर प्रकल्पांसाठी, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, सन २००८-०९ मध्ये एकूण सुमारे रु.४७९३.८५ कोटी इतका खर्च प्रस्तावित केला आहे.

५.२ घनकचरा व्यवस्थापन क्षेत्र विकसित करण्यासंबंधात डॉ.ज.मो.फाटक, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, सार्वजनिक भराव भूमीच्या (Common land fill sites) कामात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाबरोबर सहभागी होण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका उत्सुक आहे जेणेकरुन कांजूरमार्ग येथील भराव भूमीच्या कामातील अडचणी दूर होणे शक्य होईल.

५.३ श्री.शेलार, प्राधिकरणाचे सदस्य यांनी असे सांगितले की, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या छन्नमार्गासाठी केंद्र शासनाकडून व्यवहार्यता तफावत निधी अद्याप प्राप्त झालेला नाही, राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आवश्यक ती परवानगी मिळालेली

नाही, त्याचप्रमाणे रेल्वेने काही अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे. चारकोप-वांद्रे-मानखुर्द या छन्नमार्गासाठी केंद्र शासनाची मान्यता मिळूनही मॉडेल कन्सेशन ॲग्रीमेंटला केंद्र शासनाने अद्याप मान्यता दिलेली नाही. म्हणून यासंबंधातील विविध अडचणी दूर करण्यासाठी मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली एक कोअर ग्रुप (Core Group) स्थापन करुन या प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करणे आवश्यक आहे. श्री.शेलार यांनी असेही सांगितले की, सन २००७-०८ मध्ये एमआरटीएस, एमआयएएल तसेच केंद्र शासनाकडून अंशदान प्राप्त झालेले नाही, त्याचप्रमाणे जेएनएनयुआरएम अंतर्गत पूर्ण अंशदान प्राप्त झालेले नाही. त्यामुळे सन २००७-०८ मध्ये खर्च कमी प्रमाणात झाला आहे. म्हणून अशाप्रकारच्या अडचणी दूर करण्यासाठी मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सर्व संबंधितांची बैठक आयोजित करणे आवश्यक आहे. श्री.शेलार यांनी पुढे असेही सांगितले की, मुंबईतील जागेचे भाव कमी होण्यासाठी राज्य शासन नवीन गृहनिर्माण धोरण तयार करीत आहे. हे नवीन धोरण अंमलात आल्यानंतर वांद्रे-कुर्ला संकुलातील जमिनीचे भावही कमी होतील व त्यामुळे प्राधिकरणाच्या उत्पन्नात घट होईल. म्हणून राज्य शासनाने वांद्रे-कुर्ला संकुलासाठी ४.० इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करावा जेणेकरुन नवीन गृहनिर्माण धोरण येण्यापूर्वी प्राधिकरणास रिक्त भूखंडांचे वाटप करणे शक्य होईल व त्यायोगे प्राधिकरणास अधिक उत्पन्न मिळू शकेल. श्री.शेलार यांनी पुढे असेही सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील भूखंडासाठी सध्याचा दर आणि सन २००४-०५ मध्ये प्राप्त झालेला दर यांचा सुवर्णमध्य काढून येणा-या दराने भूखंडाचे वाटप करण्यासंबंधी विचार करण्यात यावा. यासंबंधात महानगर आयुक्त यांनी असे निदर्शनास आणून दिले की, प्राधिकरणास अंतिम कोर्टाचा अनुकूल निकाल न लागल्यास आयकर भरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासंबंधात आयकर विभागाची नोटीस प्राप्त झाली असून प्राधिकरणाने यासंबंधात न्यायालयात अपील दाखल केले आहे. म्हणून, खबरदारीचा उपाय म्हणून प्राधिकरणाचे उत्पन्न आवश्यकतेपेक्षा जास्त होणार नाही या दृष्टिकोनातून वांद्रे-कुर्ला संकुलातील भूखंडांचे टप्प्याटप्प्याने वाटप करणे आवश्यक आहे, अन्यथा जास्त आयकर भरावा लागेल. यासंबंधात श्री.शेलार यांनी अशी विनंती केली की, प्राधिकरणास आयकर भरावा लागू नये यासाठी मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा.

५.४ श्री.शेलार, प्राधिकरणाचे सदस्य यांनी अशी सूचना केली की, बाब टिप्पणीतील प्रस्तावित ठरावामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असून योजना, सर्वेक्षणे इत्यादी कार्यक्रम, अहवालात समाविष्ट न केलेल्या आणि प्रत्येकी रु.५० लाखापेक्षा अधिक व्यय नसलेल्या अति आवश्यक बाबींना मंजूरी देण्याचे अधिकार प्राधिकरणाने कार्यकारी समितीला प्रदान करावे. तसेच सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पापासून प्रकल्पांवरील खर्चाची प्रगती, कामाचा वेग लक्षात घेऊन प्रकल्पांतर्गत/योजनांतर्गत प्रत्येक प्रकरणी रु.१० कोटी पर्यंतचे पुनर्विनियोजनाचे (Reappropriation) अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्याऐवजी महानगर आयुक्त यांनी अशा प्रकरणी पुनर्विनियोजन करुन त्यासंबंधात प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता घ्यावी. या सूचनेस मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी मान्यता दिली.

५.५ श्री.नारायण मानकर, नगराध्यक्ष, नवघर-माणिकपूर नगरपरिषद आणि श्री.नंदकिशोर पातकर, नगराध्यक्ष, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांनी अशी सूचना केली की, सन २००८-०९ मध्ये हाती घ्यावयाची कामे लवकर सुरु करण्यात यावीत.

५.६ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.११५२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाचा अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा २००८-०९ सालचा अर्थसंकल्प आणि २००७-०८ सालचे सुधारीत अंदाजपत्रक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३(१) अन्वये मंजूर करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे योजना, सर्वेक्षणे इत्यादी कार्यक्रम, अहवालात समाविष्ट न केलेल्या आणि प्रत्येकी रु.५० लाखापेक्षा अधिक व्यय नसलेल्या अति आवश्यक बाबींना मंजूरी देण्याचा अधिकार कार्यकारी समितीला प्रदान करीत आहे.

तथापि, अशा प्रकरणाचा अहवाल आगामी बैठकीत प्राधिकरणाला सादर करण्यात यावा.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी आणि महानगर योजना - फिरता निधी यांचे अंदाजित जमा व खर्च दर्शविणारे सन २००८-०९ चे अर्थसंकल्पीय अंदाज व २००७-०८ चे सुधारीत अंदाज यांस मंजूरी देत आहे."

**बाब क्र.६ : मुंबई महानगर प्रदेशात मुंबई मेट्रो प्रकल्प व इतर पायाभूत सुविधांची अंमलबजावणी करण्याकरीता करावयाच्या पुढील कार्यवाहीबाबत.**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या बृहत आराखडयामध्ये ९ छन्नमार्गांचा समावेश असून त्यांची एकूण लांबी १४६.५ कि.मी. इतकी आहे. सदर बृहत आराखडा व प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी सुचविलेल्या टप्प्यांना दिनांक २८ मे, २००४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ११० व्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर छन्नमार्गाच्या अंमलबजावणीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सहभागाने मुंबई मेट्रो-१ प्रा.लि. ही कंपनी डिसेंबर, २००६ मध्ये स्थापन करण्यात आली असून या कंपनीने आवश्यक ते सर्वेक्षण, स्थापत्य कामे, इलेक्ट्रीकल ॲन्ड सिग्नलिंग, रोलींग स्टॉक इत्यादी कामांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण केल्या असून प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात झाली आहे. या छन्नमार्गासाठी आवश्यक असलेल्या सुमारे रु.६५० कोटी इतक्या व्यवहार्यता तफावत निधीसाठी केंद्र शासनाकडे सतत पाठपूरावा करुनही केंद्र शासनाकडून आतापर्यंत प्रतिसाद मिळालेला नाही. मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्वावर राबविण्याच्या केंद्र शासनाच्या सूचनेमुळे गेल्या दोन वर्षापासून प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकाम होऊ शकले नाही. चारकोप-वांद्रे-मानखुर्द

या छन्नमार्गास फेब्रुवारी, २००७ मध्ये केंद्र शासनाची तत्वतः मान्यता मिळूनही मॉडेल कन्सेशन ॲग्रीमेंटला केंद्र शासनाने अद्याप अंतिम रुप दिलेले नाही. त्यामुळे या छन्नमार्गासाठी वित्तीय निविदा मागविण्यास विलंब होत आहे. पुढील एका महिन्यात मॉडेल कन्सेशन ॲग्रीमेंटला केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यास चारकोप-वांद्रे-मानखुर्द या छन्नमार्गाचे प्रत्यक्ष बांधकाम नोव्हेंबर, २००९ पर्यंत सुरु होईल अशी अपेक्षा आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामासंबंधात फेब्रुवारी, २००८ मध्ये मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली मेट्रो रेल महामंडळाचे (डीएमआरसी) व्यवस्थापकीय संचालक श्री.श्रीधरन यांच्या समवेत बैठक घेण्यात आली होती. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, श्री.श्रीधरन यांनी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पासंबंधात काही सूचना केल्या आहेत. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मागील ५-१० वर्षामध्ये मुंबईत वाहतूकीच्या कोंडीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्यामुळे मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या बृहत आराखडयात सूचविलेले सर्व छन्नमार्ग तातडीने हाती घेणे आवश्यक आहे तसेच उपनगरीय रेल्वे सेवा व मेट्रो रेल्वे प्रकल्प यांना पुरवणी सेवा म्हणून सुमारे १०० कि.मी. लांबीच्या मोनोरेलची अंमलबजावणी हाती घेणे आवश्यक आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, कुलाबा-वांद्रे, चारकोप-वांद्रे-मानखुर्द, चारकोप-दहिसर, अंधेरी-दहिसर, वांद्रे-कुर्ला संकुल ते कांजूरमार्ग (व्हाया विमानतळ), शिवडी-प्रभादेवी हे मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे ६ छन्नमार्ग तसेच सुमारे १०० कि.मी. लांबीचा मोनोरेल प्रकल्प यासाठी सुमारे रु.४१,४०० कोटी इतका खर्च अपेक्षित असून सन २००६-०७ च्या भाव पातळीनुसार मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या या ६ छन्नमार्गांसाठी पुढील ५ ते ६ वर्षात सुमारे रु.३३,४०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाकरीता सुमारे ६०% निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असून उर्वरीत ४०% खर्च जपानीज बँक फॉर इंटरनॅशनल को-ऑपरेशन किंवा खाजगी संस्थांकडून मिळणे अपेक्षित आहे. अशाप्रकारे मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे ६ छन्नमार्ग तसेच सुमारे १०० कि.मी. लांबीचा मोनोरेल प्रकल्प यासाठी एकूण सुमारे रु.२९,६४० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीतून सुमारे रु.३१,००० कोटी इतका निधी उपलब्ध

..१४/-

होऊ शकेल. त्यामुळे मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे ६ छन्नमार्ग तसेच सुमारे १०० कि.मी.चे मोनोरेल प्रकल्पाचे काम प्राधिकरणाच्या निधीतून हाती घेणे शक्य होईल. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत मुंबई महानगर प्रदेशासाठी एक सर्वंकष परिवहन अभ्यास मे. ली. इंटरनॅशनल, कॅनडा या सल्लागारांमार्फत हाती घेण्यात आला असून त्यांच्या अहवालानुसार मुंबई महानगर प्रदेशात मेट्रो, मोनोरेल तसेच द्रुतगती महामार्गाच्या जाळयांसाठी पुढील ८ ते १० वर्षात सुमारे रु.१,१०,००० कोटी इतका निधी उभारण्याची आवश्यकता आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, पायाभूत सुविधा उभारणीसाठी जमिनीचा स्त्रोत म्हणून वापर करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी (१) शासकीय नागरी कमाल जमीन धारणेखालील (ULC) अतिरिक्त जमिनीसाठी ४.० पर्यंत चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करणे, (२) मेट्रो रेल्वे आणि मोनोरेल स्थानकापासून तसेच उपनगरीय रेल्वे स्थानकांपासून आणि द्रुतगती महामार्गाच्या जंक्शनच्या सभोवतील ५०० मीटर त्रिज्येच्या प्रभावित क्षेत्रातील उपलब्ध होणारा चटई क्षेत्र निर्देशांक ४.० पर्यंत वाढवून देणे, (३) वांद्रे-कुर्ला संकुलातील २० हेक्टर जमीन, वडाळा भारवाहक तळ येथील ३० हेक्टर जमीन, कांजूरमार्ग येथील ६०० हेक्टर जमीन, कल्याण/नेवाली येथील ६०० हेक्टर जमीन, दिवाणमान येथील ५०० हेक्टर जमीन तसेच वांद्रे शासकीय वसाहत येथील ५० हेक्टर जमीन या शासकीय जमिनींसाठी ४.० चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करणे, (४) BEST च्या अधिपत्याखाली असलेले सर्व बस आगार, बस स्थानके आणि इतर प्रभावित क्षेत्र या सर्व क्षेत्रांसाठी ४.० चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करणे, (५) ५ हेक्टरवरील सर्व खाजगी आराखडयांना व्यापारी विकासासाठी चटई क्षेत्र निर्देशांक ४.० पर्यंत वाढवून देणे आणि अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाद्वारे शासकीय दराप्रमाणे (Ready Reckoner) मिळणारे सर्व उत्पन्न मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या खात्यात जमा करणे, (६) शासकीय जागा / अतिरिक्त कमाल जमीन धारणा (ULC) जमीन / वांद्रे, वरळी येथील शासकीय वसाहती / बेस्ट बस आगार / बस स्थानके आणि प्रभावित क्षेत्र / सर्व विकसनशील केंद्रे / मुंबई महानगर प्रदेशातील होऊ घातलेल्या विशेष शहरी विभागांसाठी ४.० चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करणे, (७) या सर्व बाबींसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून निर्देशित करणे व चटई क्षेत्र

निर्देशांकाच्या माध्यमातून मिळणारे सर्व उत्पन्न मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या खात्यात जमा करणे इत्यादी सर्व बाबींना राज्य शासनाने मान्यता दिल्यास राज्य शासनावर कोणताही आर्थिक बोजा न पडता हे सर्व प्रकल्प कार्यान्वित करणे शक्य होईल. म्हणून यासाठी राज्य शासनास शिफारस करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर केलेला आहे. त्याचप्रमाणें (१) दिल्ली मेट्रो रेल महामंडळाची मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी अंतरिम सल्लागार म्हणून नेमणूक करणे, (२) सर्व मेट्रो छन्नमार्गांची अंमलबजावणी मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ (MMRC) मार्फत सुरु करणे, (३) मेट्रो रेल्वे व मोनोरेल प्रकल्पासाठी BEST आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून समभागासाठी विनंती करणे, (४) शासनाकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची रु.८५० कोटींची ठेव रक्कम परत करण्याकरीता विनंती करणे, (५) मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पामधील चालू कामावरील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची गुंतवणूक नियंत्रित करणे व उर्वरित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्याकरीता राज्य शासनास शिफारस करणे, (६) मेट्रो रेल्वे आणि मोनोरेलच्या सर्व मार्गांच्या व मुंबई महानगर प्रदेशातील इतर पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीची योजना ठरविणे, (७) मुंबई महानगर प्रदेशातील शासकीय व अतिरिक्त कमाल जमीन धारणा (ULC) जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यासाठी शासनास शिफारस करणे, (८) या बाबींना राज्य शासनाची मान्यता मिळाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार मुंबई महानगर प्रदेशाच्या क्षेत्रात मेट्रो रेल्वे, मोनोरेल, बस जलद परिवहन सेवा, महानगर द्रुतगती महामार्ग या पायाभूत सुविधांची अंमलबजावणी हाती घेणे इत्यादी बाबींना मंजूरी देण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**६.२** श्री.शेलार, प्राधिकरणाचे सदस्य यांनी असे सूचविले की, प्रस्तावित मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाची रचना सर्व लोकांना समजणे आवश्यक आहे. तसेच वर्सोवा येथील कारशेडच्या जागेसाठी न्यायालयाने स्थगिती दिली आहे. दिनांक २७ ऑक्टोबर, २००६ रोजीच्या पत्राद्वारे सूचना करुनही ही जागा घेण्यासाठी संबंधितांबरोबर Consent Agreement केलेली नाही. म्हणून मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या छन्नमार्गासाठी आवश्यक असलेल्या जमिनी Consent Agreement द्वारे संपादन करण्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात यावी. यासंबंधात आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

६.३ श्री.जी.एस.गिल, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी अशी सूचना केली की, चारकोप-वांद्रे-मानखुर्द छन्नमार्ग नवीन विमानतळापर्यंत पुढे वाढविण्यात यावा.

६.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.११५३ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोट-कलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे :-

(१) दिल्ली मेट्रो रेल महामंडळाची मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी अंतरिम सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

(२) सर्व मेट्रो छन्नमार्गांची अंमलबजावणी मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ (MMRC) मार्फत सुरु करण्यास मान्यता देत आहे.

(३) मेट्रो रेल्वे व मोनोरेल प्रकल्पासाठी BEST आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून समभागासाठी विनंती करण्यास मान्यता देत आहे.

(४) राज्य शासनाकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची रु.८५० कोटींची ठेव रक्कम परत करण्याकरीता विनंती करण्यास मान्यता देत आहे.

(५) मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पामधील चालू कामावरील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची गुंतवणूक नियंत्रित करणे व उर्वरीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्याकरीता राज्य शासनास शिफारस करीत आहे.

(६) मेट्रो रेल्वे आणि मोनोरेलच्या सर्व मार्गांच्या व मुंबई महानगर प्रदेशातील इतर पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीची योजना ठरविण्यास मान्यता देत आहे.

(७) मुंबई महानगर प्रदेशातील शासकीय व अतिरिक्त कमाल जमीन धारणा (ULC) जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला हस्तांतरीत करण्याकरीता राज्य शासनास शिफारस करीत आहे.

..१७/-

(८) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून खालील भागांसाठी निर्देशित करण्यासाठी शासनास शिफारस करीत आहे :-

(अ) ,कांजूरमार्ग शासकीय जागांसाठी

(ब) कल्याण - नेवालीसाठी

(क) वसईतील दिवाणमान व इतर काही सर्वेक्षण करावयाच्या जागांसाठी

(ड) वांद्रे शासकीय वसाहत

(९) निवड करण्यात आलेल्या मेट्रो / उपनगरीय स्थानके / द्रुतगती मार्ग जंक्शनच्या ५०० मीटर त्रिज्येतील क्षेत्राला प्रभावित भाग म्हणून घोषित करणे आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून निर्देशित करण्यासाठी राज्य शासनास शिफारस करीत आहे.

(१०) ५ हेक्टरवरील सर्व खाजगी आराखडयांना व्यापारी विकासासाठी चटई क्षेत्र निर्देशांक ४.० पर्यंत वाढवून देण्यास आणि अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाद्वारे शासकीय दराप्रमाणे (Ready Reckoner) मिळणारे सर्व उत्पन्न मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या खात्यात जमा करण्यास राज्य शासनास शिफारस करीत आहे.

(११) शासकीय जागा / अतिरिक्त कमाल जमीन धारणा (ULC) जमीन / वांद्रे, वरळी येथील शासकीय वसाहती / बेस्ट बस आगार / बस स्थानके आणि प्रभावित क्षेत्र / सर्व विकसनशील केंद्रे / मुंबई महानगर प्रदेशातील होऊ घातलेल्या विशेष शहरी विभागांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून निर्देशित करण्यास तसेच या सर्वांसाठी ४.० चटई क्षेत्र निर्देशांकाची मान्यता देण्यास राज्य शासनास शिफारस करीत आहे.

(१२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास ज्या क्षेत्रासाठी राज्य शासनाने विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून निर्देशित केले आहे / करावयाचे आहे त्या क्षेत्रांतून चटई क्षेत्र निर्देशांकाच्या माध्यमातून मिळणारे सर्व उत्पन्न मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या खात्यात जमा करण्यास राज्य शासनास शिफारस करीत आहे.

(१३) वरील बाबींना राज्य शासनाची मान्यता मिळाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार मुंबई महानगर प्रदेशाच्या क्षेत्रात मेट्रो रेल्वे, मोनोरेल, बस जलद परिवहन सेवा, महानगर द्रुतगती महामार्ग या पायाभूत सुविधांची अंमलबजावणी हाती घेण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील प्रस्तावांना राज्य शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास कार्यकारी समितीस याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेशासाठी सर्वंकष परिवहन अभ्यास.**

७.१ मुंबई महानगर प्रदेशासाठी सर्वंकष परिवहन अभ्यासासंबंधात सादरीकरणाद्वारे श्री.जॉन लाँग, टीम लिडर, मे. ली.इंटरनॅशनल, कॅनडा यांनी अभ्यासाची उद्दिष्टे, अभ्यासासाठी केलेली विविध सर्वेक्षणे, अभ्यासाच्या प्रगतीनुसार तयार केलेले विविध अहवाल, लोकसंख्या आणि रोजगार यांची पर्यायी रुपरेषा यासंबंधात माहिती दिली. दीर्घ मुदतीच्या परिवहन धोरणासंबंधात श्री.जॉन लाँग यांनी असे सांगितले की, सल्लागारांनी प्रस्तावित केलेल्या दीर्घ मुदतीच्या परिवहन धोरणानुसार मुंबई महानगर प्रदेशातील विविध कामांसाठी सन २०३१ पर्यंत सुमारे रु.२,०७,९५६ कोटी (सन २००६-०७ भाव पातळीनुसार) इतक्या निधीची आवश्यकता आहे. त्यामध्ये सुमारे रु.१,१०,०९५ कोटी खर्चाचे मेट्रो रेल्वे प्रकल्प, सुमारे रु.३०,९७८ कोटी खर्चाचे नवीन उपनगरी रेल्वे प्रकल्प, सुमारे रु.५७,४१२ कोटी खर्चाचे रस्ते प्रकल्प, सुमारे रु.१,६७० कोटी खर्चाचे केवळ बस मार्गासह महाछन्नमार्ग, सुमारे रु.४,२८० कोटी खर्चाचे बस व्यवस्था प्रकल्प, सुमारे रु.४८० कोटी खर्चाचे प्रवासी जलवाहतूक प्रकल्प तसेच सुमारे रु.३,०४० कोटी खर्चाचे ट्रक टर्मिनल, आंतरराज्य बस टर्मिनल तसेच रेल टर्मिनल इत्यादी प्रकल्पांचा समावेश आहे. सल्लागारांनी तयार केलेल्या अहवालामध्ये या प्रकल्पांबरोबर पुढील ५, १० व १५ वर्षातील टप्प्यांमध्ये राबविण्याच्या प्रकल्प योजना तसेच त्यासाठी लागणा-या निधी उभारणीचे धोरण समाविष्ट आहे. निधी उभारण्याच्या स्त्रोतासंबंधात श्री.जॉन लाँग यांनी असे सांगितले की, एकूण अंदाजित खर्चाच्या सुमारे २०% रक्कम शासकीय/स्थानीय संस्थांच्या अनुदानाद्वारे, २८% रक्कम विकास आकाराद्वारे, १२% रक्कम कर्जाद्वारे तसेच ४०% रक्कम खाजगी गुंतवणूकीद्वारे उभी करावी असे प्रस्तावित केले आहे. प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी अंमलबजावणी संस्थेच्या रचनेसंबंधी माहिती देताना श्री.जॉन लाँग यांनी असे सांगितले की, शासन स्तरावर सर्व स्थानिक संस्थांची खर्च करण्याची क्षमता तपासून त्यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी उपाययोजना करणे, हा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविणा-या सर्व स्थानिक व संबंधीत संस्थांवर सोपविलेली जबाबदारी तसेच दरवर्षी ठरविलेल्या कामांच्या प्रगतीचा आढावा घेणे आवश्यक आहे. म्हणून यासाठी सल्लागारांनी तीन स्तरावर नियोजन आणि नियंत्रणाकरीता

एकात्मिक महानगर परिवहन प्राधिकरण (UMTA) स्थापन करण्याची शिफारस केली आहे. UMTA ची रचना व रुपरेषासंबंधी श्री.जॉन लाँग यांनी माहिती दिली. श्री.जॉन लाँग यांनी पुढे असेही सांगितले की, सल्लागारांनी तयार केलेल्या अहवालाच्या मसुद्यासंबंधात संबंधित स्थानिक संस्थांबरोबर दिनांक २१ ते २५ मे, २००७ दरम्यान विविध बैठका घेऊन चर्चा करण्यात आली. मध्यम मुदतीचे आणि दीर्घ मुदतीचे गुंतवणूकीचे कार्यक्रम तयार करण्यात आले असून सदर कार्यक्रम सप्टेंबर, २००७ मध्ये सादर करण्यात आले. सल्लागारांच्या अंतिम अहवालाचा मसुदा मार्च, २००८ अखेर उपलब्ध होईल अशी अपेक्षा असून सदर अहवालास अंतिम रुप देण्यासाठी संबंधित संस्था म्हणजे मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिका, नगरपालिका इत्यादी यांच्याबरोबर बैठका आयोजित करुन चर्चा करण्यात आली. तसेच मा.राज्यमंत्री, नगर विकास यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१ जानेवारी, २००८ रोजी मुंबई महानगर प्रदेशातील सर्व खासदार, आमदार, महापौर, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, नगराध्यक्ष, महापालिका आयुक्त, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपालिका आयुक्त, नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी व पायाभूत विकास संस्थेचे प्रमुख यांची बैठक आयोजित करण्यात आली होती व त्या बैठकीमध्ये सल्लागारांच्या अंतिम अहवालाच्या मसुद्यासंबंधात सादरीकरण करण्यात येऊन त्यासंबंधात चर्चा करण्यात आली.

७.२ श्री.शेलार, प्राधिकरणाचे सदस्य यांनी असे निदर्शनास आणून दिले की, सन १९६२ मध्ये मे.विल्बर स्मिथ अँड असोसिएट्स या सल्लागारांनी मुंबईसाठी परिवहन अभ्यास करुन शिफारस केलेले रस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखडयात समाविष्ट केलेले आहेत. या रस्त्यांपैकी जे रस्ते सध्या अस्तित्वात नाहीत, उदा. सेन्ट्रल आयलॅन्ड एक्सप्रेस-वे, असे रस्ते विकास आराखडयामधून काढून टाकावेत. यासंबंधात डॉ.ज.मो.फाटक, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे स्पष्ट केले की, याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रस्ताव तयार केला आहे.

७.३ श्री.शेलार, प्राधिकरणाचे सदस्य यांनी पुढे असे सूचविले की, मरीना बांधण्यास परवानगी देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे विनंती करावी. बृहत आराखडयात सुचविलेल्या मेट्रो रेल्वे, मोनोरेल तसेच महानगर द्रुतगती महामार्गाच्या (Metropolitan Expressway) ५०० मीटर त्रिज्येच्या क्षेत्राला प्रभावित भाग म्हणून घोषित करणे, त्याचा विकास व नियंत्रणाकरिता

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून निर्देशित करण्यासाठी राज्य शासनास शिफारस करणे या प्रस्तावासंबंधात श्री.शेलार, प्राधिकरणाचे सदस्य यांनी असे सांगितले की, विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून अनेक संस्थांची नेमणूक करुन त्यांना सर्वाधिकार दिल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे फारसे अधिकार शिल्लक राहणार नाहीत. यासंबंधात मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे स्पष्ट केले की, मेट्रो रेल्वे प्रकल्प, मोनोरेल प्रकल्प इत्यादी प्रकल्पांसाठी निधी उभारण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून निर्देशित करणे आवश्यक असून या प्रकल्पांसाठी स्थापन करावयाच्या विविध महामंडळांमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्था समभाग (Equity) घेऊन सहभागी होऊ शकतात.

७.४ श्री.रविंद्र वायकर, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अशी सूचना केली की, बृहन्मुंबईच्या पाणी पुरवठयासही प्राधान्य देऊन आवश्यक त्या उपाययोजना हाती घेणे आवश्यक आहे. यासंबंधात मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे स्पष्ट केले की, बृहन्मुंबईला पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेची आहे.

७.५ श्री.नंदकिशोर पातकर, नगराध्यक्ष, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांनी अशी सूचना केली की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सध्या हाती घेतलेला कुर्ला-ठाणे ६ वा रेल्वे मार्ग पुढे कल्याण पर्यंत वाढविण्यात यावा तसेच सर्व उपनगरी रेल्वे गाडया १२ डब्यांच्या कराव्यात. श्री.पातकर यांनी पुढे असेही सांगितले की, मुंबईचा विकास करताना उर्वरीत महानगर प्रदेशावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. यासंबंधात श्री.संजय उबाळे, सचिव (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग यांनी असे स्पष्ट केले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-टप्पा-२ मध्ये उपनगरी रेल्वे सेवेमध्ये लक्षणीय सुधारणा करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार असून पुढील ४ ते ५ वर्षात सदर प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. श्री.शेलार, प्राधिकरणाचे सदस्य यांनी यासंबंधात असे निदर्शनास आणून दिले की, सन २००८-०९ च्या रेल्वे अर्थसंकल्पात मुंबई नागरी

परिवहन प्रकल्प-टप्पा-२ साठी केवळ रु.१ लाख इतकी तरतूद केली असून ही तरतूद वाढविण्यासाठी राज्य शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासंबंधात श्री.जॉनी जोसेफ, मुख्य सचिव यांनी असे स्पष्ट केले की, रेल्वेने चालू वर्षासाठी रु.१ लाख इतकी तरतूद केली असली तरीही पुढील ४ ते ५ वर्षात मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-टप्पा-२ पूर्ण करण्याची बांधिलकी (Commitment) व्यक्त केली आहे.

७.६ श्री.नंदकिशोर पातकर, नगराध्यक्ष, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांनी अशी सूचना केली की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-टप्पा-२ ची कामे पूर्ण होईपर्यंत प्रवाशांसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून ठाण्यापासून पुढे बदलापूर पर्यंतच्या भागात बस सेवा सुरु करण्यात यावी. या सूचनेस मान्यता देऊन मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे निदेश दिले की, यासंबंधात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाबरोबर बैठक आयोजित करण्यात यावी.

७.७ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.११५४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोट-कलम (क), (ड) व (ई) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे :-

(१) मे.ली. इंटरनॅशनल यांनी तयार केलेल्या सर्वंकष परिवहन अभ्यास धोरणाला मान्यता देत आहे.

(२) मुंबई महानगर प्रदेशातील योजना तसेच सर्व स्थानिक संस्थांचा विकास आराखडा परिवहन धोरणाच्या आधारावर अद्ययावत करण्यास मान्यता देत आहे.

(३) सर्वेक्षण केलेल्या विविध प्रकल्पांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास मान्यता देत आहे.

..२२/-

(४) बृहत आराखडयात सुचविलेल्या परिवहन व्यवस्थेच्या संरक्षणासाठी तसेच आजूबाजूच्या विकासाचे विनियमन आणि नियंत्रणासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून निर्देशित करण्याकरीता राज्य शासनास शिफारस करीत आहे.

(५) पुढील १५ वर्षांचा परिवहन कार्यक्रम कार्यान्वित करण्यास मान्यता देत आहे.

(६) परिवहन व्यवस्थेच्या विकासासाठी एक समर्पित निधी निर्माण करण्यास मान्यता देत आहे.

(७) मुंबई महानगर प्रदेशाकरीता एकात्मिक महानगर परिवहन प्राधिकरण (UMTA) स्थापन करण्यास मान्यता देत आहे.

(८) बृहत आराखडयात सूचविलेल्या मेट्रो रेल्वे, मोनोरेल तसेच महानगर द्रुतगती महामार्गाच्या (Metropolitan Expressway) ५०० मी. त्रिज्येच्या क्षेत्राला प्रभावित भाग म्हणून घोषित करणे, त्याचा विकास व नियंत्रणाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून निर्देशित करण्यासाठी राज्य शासनास शिफारस करीत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील प्रस्तावांना राज्य शासनाची मंजूरी प्राप्त करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : मुंबई महानगर प्रदेश कार्ययोजना (Business Plan) शासनास सादर करण्यास मान्यता देणेबाबत.**

८.१ मुंबई महानगर प्रदेशाच्या कार्ययोजनेसंबंधात सादरीकरणाद्वारे माहिती देताना श्री.व्ही.के.फाटक, टीम लीडर, बिझीनेस प्लॅन प्रोजेक्ट, ली.असोसिएटस्, साऊथ एशिया यांनी असे सांगितले की, मुंबई परिवर्तन प्रकल्पाचा एक भाग म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशाची कार्ययोजना तयार करावी असे शासनाने आदेश दिले होते. त्यानंतर, मुंबई ट्रान्सफॉर्मेशन सपोर्ट युनिट यांनी कार्ययोजना तयार करण्यासाठी टर्म्स ऑफ रेफरन्स तयार केले. त्यानंतर, प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मान्यतेने ऑगस्ट, २००६ मध्ये

..२३/-

मे.ली इंटरनॅशनल, कॅनडा यांना कार्ययोजना तयार करण्याचे काम सोपविण्यात आले. श्री.फाटक यांनी कार्ययोजनेची उद्दिष्टये, कार्ययोजना तयार करण्यासाठी सल्लागारांनी केलेली कामे, प्रारुप कार्ययोजनेची लक्ष्ये, कार्ययोजनेमध्ये महानगर प्रदेशाच्या विकासासाठी निश्चित केलेली साध्ये इत्यादी संबंधी माहिती दिली. भांडवली गुंतवणूकीच्या गरजांसंबंधी माहिती देताना श्री.फाटक यांनी असे सांगितले की, महानगर प्रदेशाची २०२१ सालची लोकसंख्या जवळजवळ ३० दशलक्ष होईल आणि सुमारे १२ दशलक्ष रोजगार उपलब्ध होतील. लोकसंख्या व रोजगार यांचे मुंबई महानगर प्रदेशातील विविध क्षेत्रांमधील भविष्य काळातील वाटपांचे विविध पर्याय तयार करण्यात आले आहेत व त्यांच्या पायाभूत सुविधांच्या गरजांवरील परिणामांचे मूल्यमापन करण्यात आले असून संभाव्य पर्यायांच्या आधारे पायाभूत सुविधांमधील भांडवली गुंतवणूकीचे अंदाज बांधण्यात आले आहेत. त्यानुसार, सन २००५-२०२१ या कालावधीत विविध स्तरावरील पायाभूत सुविधांसाठी सुमारे रु.२,९१,१३२ कोटी इतक्या गुंतवणूकीची आवश्यकता असून त्यामध्ये राष्ट्रीय स्तरावरील पायाभूत सुविधांसाठी सुमारे रु.३३,३३७ कोटी, महानगर स्तरावरील पायाभूत सुविधांसाठी (विजेचा समावेश करुन) सुमारे रु.२,२०,७६४ कोटी, नागरी पायाभूत सुविधांसाठी सुमारे रु.२४,८१० कोटी तसेच जमीन, स्थावर मालमत्ता व गृहनिर्माण यासाठी सुमारे रु.१२,२२१ कोटी इतक्या गुंतवणूकीचा समावेश आहे. राष्ट्रीय स्तरावरील पायाभूत सुविधांच्या आणि वीज पुरवठयासाठीच्या गुंतवणूकीच्या गरजा राष्ट्रीय, राज्यस्तरीय व खाजगी क्षेत्राकडून उपलब्ध होऊ शकतील आणि स्थानिक नागरी स्तरावरील गरजांपैकी ६२% गुंतवणूक स्थानिक करांवरील आकार आणि कर व दर गोळा करण्याच्या क्षमतेमध्ये सुधारणा करुन भागविणे शक्य आहे. महानगरीय स्तरावरील गुंतवणूकीसाठी निधी उभारण्यासाठी स्थावर मालमत्ता विकासाची व्याप्ती वाढविणे आणि यावर बाजारातील किंमतीच्या आधारे विकास आकार (Development Charge) लागू करणे असा उपाय सल्लागारांनी सुचविला आहे. त्यानुसार, एकूण गुंतवणूकीपैकी शासनाकडून प्राप्त होणारा निधी २२%, स्वतःचे स्त्रोत अथवा विकास आकार याद्वारे २९%, कर्जाद्वारे २२% आणि खाजगी/सार्वजनिक क्षेत्राद्वारे २७% अशी वित्त व्यवस्था सुचविण्यात आली आहे. संस्थात्मक रचनेसंबंधी अहवालात पुढील सूचना करण्यात आल्या आहेत –
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची पुनर्रचना व बळकटीकरण करणे. यामध्ये प्राधिकरणातील कार्य विभागणी ही विकास नियोजन, जलस्त्रोत नियोजन व विकास, परिवहन,

..२४/-

आर्थिक वृध्दी व पायाभूत सुविधांसाठी वित्त व्यवस्था या क्षेत्रांमध्ये करावी आणि मुंबई परिवर्तन प्रकल्पाशी संबंधित स्थापन करण्यात आलेल्या सिटीझन ॲक्शन ग्रुप, एम्पॉवर्ड कमिटी आणि मुंबई ट्रान्सफॉर्मेशन सपोर्ट युनिट यांचे अनुक्रमे प्राधिकरण, कार्यकारी समिती व महानगर आयुक्त कार्यालय यांच्याबरोबर एकात्मिकरण करावे असे सुचविले आहे, (२) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान (जे.एन.एन.यु.आर.एम.) अंतर्गत तयार करण्यात येत असलेले शहर विकास योजना व भांडवली गुंतवणूक योजना या सांविधानिकदृष्टया आवश्यक करुन त्यांची स्थानिक विकास आराखडयाशी जुळवणी करणे, (३) नागरी विकासाच्या सुयोग्य व्यवस्थापनासाठी भौगोलिक माहिती यंत्रणेचा वापर करणे, (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (प्रस्तावित नवीन भूमिकेस अनुसरुन) आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षमतांचा विकास करणे, (५) कार्ययोजनेमधील प्रस्तावित सुधारणांची अंमलबजावणी करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, महानगर नियोजन समिती अधिनियम, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम इत्यादी संबंधित अधिनियमांमध्ये सुधारणा करणे, तसेच कार्ययोजनेच्या कृती योजनेमध्ये (Action Plan) सुचविण्यात आलेल्या विविध कृतींमध्ये प्रामुख्याने पुढील कृतींचा समावेश होतो – (अ) <u>आर्थिक वृध्दीचे नियोजन</u> : (१) आर्थिक वृध्दीच्या नियोजनाची जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणावर टाकावी व यासंबंधी प्राधिकरणाने बळकटीकरण करावे, (२) प्राधिकरणाने महानगर प्रदेशाच्या व्याप्तीसाठी आर्थिक कार्ये व रोजगार याबद्दलची माहिती यंत्रणा विकसित करावी, (३) व्यवसाय करण्याच्या सुलभतेमध्ये सुधारणा करण्यासाठी आवश्यक असल्यास आणखी सर्वेक्षणे करावीत व कायदे, विनियम व कार्यपध्दतींमध्ये आवश्यक सुधारणा कराव्यात, (४) प्राधिकरणाने स्थानिक कौशल्ये व लहान वस्तु निर्मिती कारखान्यांतून निर्माण होणारा रोजगार या बाबी विचारात घेऊन स्थानिक आर्थिक विकासाच्या योजना तयार कराव्यात, (५) आवश्यक कौशल्ये विकसित करण्यासाठी उद्योगधंदे, शासन आणि शिक्षण संस्थांमध्ये प्राधिकरणाने मध्यस्थी करावी. (ब) <u>जमीन, स्थावर मालमत्ता व गृहनिर्माण</u> : (१) जमीन व विकास हक्कांच्या पुरवठयावरील कायदेशीर बंधने काढून टाकणे, नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम रद्द करणे आणि सीआरझेड-२ च्या तरतूदींमध्ये बदल करणे, (२) जलद वाहतूक जाळयाच्या आजुबाजूच्या नवीन जमिनींचा तसेच खार जमिनींचा विकास करुन जमिनींच्या

..२५/-

पुरवठयामध्ये वाढ करावी, (३) सर्वंकष परिवहन अभ्यासामध्ये प्रस्तावित केलेले रेल्वे व रस्त्यांचे जाळे विचारात घेऊन प्रादेशिक योजना आणि विविध विकास आराखडयांमध्ये सुधारणा करावी, यामध्ये प्रवासाची सुलभता, लोकसंख्येच्या गरजा आणि जुने भाग व गलिच्छ वस्त्यांचा पुनर्विकास यांचा विचार करुन चटई क्षेत्र निर्देशांकामध्ये संयुक्तता आणावी, (४) माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करुन विकास नियंत्रण नियमावली व कार्यपध्दतींचे सुलभीकरण करावे जेणेकरुन बांधकाम परवानगीसाठीचा अवधी कमी होईल, (५) विविध भौगोलिक घटकांसाठी वाणिज्यिक बांधकामे, गृहनिर्माण आणि स्थावर मालमत्तेच्या किंमती यांचे संनियंत्रण करेल अशी भौगोलिक माहिती यंत्रणा विकसित करावी. (क) <u>पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा व वित्त व्यवस्था</u> : (१) प्राधान्याने विकसित करावयाचे महानगरीय प्रकल्प तात्काळ हाती घ्यावेत, (२) स्थानीय नागरी संस्थांनी त्यांची कर व दर वसूलीची कार्यक्षमता वाढवून व वापर आकार लावण्यामध्ये सुधारणा करुन त्यांची कर्ज परतफेडीची क्षमता वाढवावी, जेणेकरुन चांगल्याप्रकारे तयार केलेल्या प्रकल्पांचा समावेश असलेल्या भांडवली गुंतवणूक योजनेची अंमलबजावणी करता येईल, आणि (ड) <u>शासन यंत्रणा</u> : (१) नागरी जमीन कमालधारणा अधिनियम (यु.एल.सी. ॲक्ट) रद्द करावा, भाडे नियंत्रण कायद्यामध्ये बदल करावा, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियममाध्ये बदल करावा जेणेकरुन प्रादेशिक योजनेच्या अंमलबजावणीसाठी नगर नियोजन योजना (Town Planning Schemes) तयार करणे, बाजारातील किंमतीनुसार विकास आकार लावणे शक्य होईल, शहर विकास योजना व भांडवली गुंतवणूक योजना तयार करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमात बदल करणे आणि स्थानिक शहर विकास आराखडयांवर आधारीत महानगरीय योजना तयार करण्यासाठी महानगर योजना समितीच्या अधिनियमात बदल करणे, (२) आर्थिक वृध्दी, पायाभूत सुविधांसाठी वित्त पुरवठा, जलस्त्रोत विकास आणि संनियंत्रण व योजनेच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन यासंबंधी उपाययोजना करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची पुनर्रचना करावी व महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा निधीला (MUIF) भांडवली बाजारातून निधी उभारण्यासाठी एक वित्तीय मध्यस्थ संस्थेचे स्वरुप द्यावे, (३) महानगर प्रदेशासाठी स्थानिक संस्थांच्या योजनांचा समावेश केलेली पंचवार्षिक योजना व

..२६/-

भांडवली गुंतवणूक योजना तयार करण्याची पध्दत निर्माण करावी आणि नियोजनासाठी व संनियंत्रणासाठी भौगोलिक माहिती यंत्रणा वापरावी व ई-गव्हर्नन्सचा वापर करावा, (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षमतेमध्ये सुधारणा करावी व प्राधिकरणाने महानगर प्रदेशातील स्थानिक नागरी संस्थांच्या क्षमता सुधारणेसाठी प्रयत्न करावेत.

८.२ कार्ययोजनेच्या अहवालामध्ये सल्लागारांनी सूचविलेल्या विविध योजनांसंबंधात, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, प्राधिकरणाच्या अभिप्रायांसंबंधात महानगर आयुक्त यांनी माहिती दिली. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, कार्ययोजना तयार करण्याचे काम प्राधिकरणाने शासनाच्या निदेशानुसार हाती घेतले असल्यामुळे आणि या कार्ययोजनेतील विविध प्रस्तावांवरील कार्यवाही प्राधिकरणाच्या अधिकारांच्या बाहेर असल्यामुळे सदर कार्ययोजना शासनास सादर करण्याचे प्रस्तावित आहे. कार्ययोजना व त्यावरील प्राधिकरणाचे अभिप्राय यास प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतर सदर कार्ययोजना त्यावरील प्राधिकरणाच्या अभिप्रायांसह शासनास सादर करण्यात येईल.

८.३ डॉ.ज.मो.फाटक, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, कार्ययोजनेमध्ये सुचविलेल्या विकास आकाराच्या मुद्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये पूर्वी चर्चा झाली असून विकास आकार हा रेडी रेकनॉरच्या दराशी जोडण्यात येऊ नये असे मत पालिकेच्या नगर नियोजकांनी दिले आहे.

८.४ श्री.शेलार, प्राधिकरणाचे सदस्य यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाची प्रस्तावित कार्ययोजना चांगली असून खाजगी गुंतवणूकीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. तथापि, विकास आकारात वाढ करु नये.

..२७/-

८.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.११५५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेशासाठी सल्लागारांच्या मदतीने तयार करण्यात आलेल्या कार्ययोजनेचा (Business Plan) प्रारुप अंतिम अहवाल व त्यावरील प्राधिकरणाचे अभिप्राय शासनास सादर करण्यास मान्यता देत आहे."

**मा.अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा केलेले इतर विषय –**

(१) श्री.सुनिल प्रभु, प्राधिकरणाचे सदस्य यांनी अशी सूचना केली की, गोरेगाव-मुलुंड जोडरस्त्यापैकी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग आणि फिल्मसिटी यांना जोडणा-या रस्त्याचा भाग अरुंद असल्यामुळे सदर भागाचे रुंदीकरण हाती घेऊन गोरेगाव-मुलुंड जोडरस्त्याचे अर्धवट राहिलेले काम तातडीने पूर्ण करण्यात यावे.

या सूचनेस मा. अध्यक्ष, प्राधिकरण यांनी मान्यता दिली.

(२) श्री.रविंद्र वायकर, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका व श्री.सुनिल प्रभु, प्राधिकरणाचे सदस्य यांनी अशी सूचना केली की, आरे कॉलनी येथील अतिक्रमणे तातडीने काढण्यात यावीत.

या सूचनेस मा. अध्यक्ष, प्राधिकरण यांनी मान्यता दिली.

(३) श्री.नरेंद्र मेहता, महापौर, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी असे सांगितले की, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील अतिक्रमणे हटविण्यासाठी पोलीसांची मदत उपलब्ध करुन द्यावी असा प्रस्ताव शासनाकडे पाठविला असून शासनाने याबाबत तातडीने पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

************